आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२८ मे २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकांच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्याचा प्रचार शिगेला, विविध ठिकाणी प्रचारसभांचा धडाका

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आज झारखंडमध्ये प्रचारसभा, इंडिया आघाडीच्याही प्रचारालाही वेग

- मिझोराममध्ये दरड कोसळून किमान १० जणांचा मृत्यू, बचावकार्य युद्धपातळीवर सुरू,

- मुंबई विमानतळावर सीमाशुल्क विभागानं चार दिवसांत पकडली सोनं आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची मोठी तस्करी

**आणि**

- उजबेकिस्तानसोबतच्या मैत्रीपूर्ण लढतीसाठी महिला फुटबॉल संघाची घोषणा

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यासाठी सर्व राजकीय पक्षांचा  जोरदार प्रचार सुरू आहे. रालोआ आणि इंडिया आघाडीचे नेते आज देशात विविध ठिकाणी प्रचारसभा घेणार आहेत.

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज झारखंडमधल्या डुमका इथं भाजपा उमेदवार सीता सोरेन यांच्या प्रचार सभेला संबोधित करणार आहेत. सीता सोरेन या झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबु सोरेन यांच्या स्नुषा असून त्या झारखंड मुक्ती मोर्चाच्या नलिन सोरेन यांच्याविरोधात निवडणूक लढत आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज ओदिशामधल्या भद्रक लोकसभा मतदारसंघात प्रचारसभा घेणार आहेत.

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आज बिहारमधल्या पाटणा साहिब आणि पाटलीपुत्र लोकसभा मतदारसंघात आज भाजपा उमेदवारासांठी प्रचारसभा घेणार आहेत. तर बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार नालंदा लोकसभा मतदारसंघात रोड शो करणार आहेत.

राजदचे नेते तेजस्वी यादव बक्सर, सासाराम, जेहनाबाद आणि पाटलीपुत्र लोकसभा मतदारसंघातल्या प्रचारसभांना संबोधित करतील. तर विकासशील इन्सान पार्टीचे मुकेश सहनी इंडिया आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत.

**<><><><><>**

काँग्रेस आरक्षणाच्या नावाखाली मतपेढीचं राजकारण करत असून, विरोधक केवळ मतांसाठी संविधानाच्या मूलभूत ढाच्याचं उल्लंघन करत असल्याची टीका प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी केली. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. सरकार राष्ट्रीय तपास संस्थांचा गैरवापर करत असल्याच्या विरोधकांच्या आरोपाचं मोदी यांनी यावेळी खंडन केलं. आपलं सरकार भ्रष्टाचार अजिबात सहन करत नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी वीर सावरकर यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली आहे.

मातृभूमीच्या सेवेसाठी आपलं जीवन समर्पित करणारे वीर सावरकर

देशवासीयांसाठी नेहमीच प्रेरणास्थान राहतील असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या  एका पोस्टमध्ये म्हटलं आहे.

राज्यपाल रमेश बैस यांनी वीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त आज राजभवनात त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं.

वीर सावरकर यांच्या देशभक्तीला, प्रेरणादायी विचार आणि तेजस्वी व्यक्तिमत्वाला नमन असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या  एका पोस्टमध्ये म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतल्या शासकीय निवासस्थानी वीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन केलं आहे.

<><><><><>

मिझोराममध्ये आज सकाळी दरड कोसळून किमान १० जणांचा मृत्यू झाला. राजधानी ऐझवलपासून चार किलोमीटर अंतरावरच्या ल्हिमेन इथं ही घटना घडली. मृतांची ओळख अद्याप पटलेली नाही. बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसानं मोझारममधलं जनजीवन विस्कळीत झाली आहे.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये रेमाल चक्रीवादळाशी संबंधित विविध घटनांमध्ये ६ जण मृत्युमुखी पडले असून, जोरदार वारे आणि पावसामुळे कोलकाता आणि लगतच्या २४ जिल्ह्यांमधलं जनजीवन विस्कळीत झालं आहे. किनारपट्टी प्रदेशातली शेत जमीन आणि मासेमारी केंद्रांमध्ये समुद्राचं पाणी शिरलं आहे.

दरम्यान, चक्रीवादळाचा प्रभाव ओसरू लागल्यावर नागरिक निवारा छावण्यांमधून आपल्या घरी परतू लागले असून,  लोकसभा निवडणुकीच्या सातव्या

आणि शेवटच्या टप्प्यासाठी विविध जिल्ह्यांमध्ये प्रचार मोहीम पुन्हा सुरु झाली आहे.

<><><><><>

रेमाल चक्रीवादळाच्या प्रभावामुळे आसाम मध्ये जोरदार पाऊस पडत असून अनेक जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा जारी करण्यात आला आहे.

संततधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे गोहाटी सह अनेक जिल्ह्यांमध्ये काल संध्याकाळपासून वीजपुरवठा खंडित झाला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून अनेक जिल्हा प्रशासनांनी आज शाळा बंद ठेवल्या असून, ईशान्य फ्रंटियर रेल्वेनंही अनेक गाड्या रद्द केल्या आहेत. अनेक जिल्ह्यांमधे रेड अलर्ट आणि ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

हवामान विभागानं आज गोलपारा, दिमा हासाओ, कछार आणि करीमगंज या जिल्ह्यांना अती  मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.

ब्रह्मपुत्रा नदीच्या मुख्य पात्रा मधली, तसंच बराक खोऱ्यातल्या  बराक आणि कुसियारा नदीतल्या प्रवासी बोट सेवेचं नियमन करण्याचे आदेश राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं दिले आहेत.

<><><><><>

रेमाल चक्रीवादळामुळे निर्माण झालेली परिस्थिती हाताळण्यात भारतीय तटरक्षक दलानं महत्त्वाची भूमिका बजावल्याचं संरक्षण मंत्रालयानं काल जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. तटरक्षक दलाच्या ईशान्य मुख्यालयानं सुरक्षिततेच्या दृष्टीनं पावलं उचलली आणि केंद्रीय आणि राज्य पातळीवरच्या यंत्रणांशी योग्य समन्वय साधला. त्यामुळे  समुद्रात कोणतीही वित्त किंवा जीवितहानी झाली नाही, असं मंत्रालयानं नमूद केलं आहे.

**<><><><><>**

मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर गेल्या चार दिवसांमध्ये केलेल्या विविध कारवायांमध्ये एकूण १० किलो ६०० ग्रॅम सोनं आणि ८ कोटी ६८ लाख रुपये किमतीच्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंची तस्करी उघडकीला आणली असून, ३ जणांना अटक केल्याचं  सीमाशुल्क विभागानं काल जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या व्यतिरिक्त  ३१ प्रकरणांमध्ये परदेशी चलन देखील  जप्त केल्याचं यात म्हटलं आहे.

सोन्याच्या तस्करीसाठी मेणामध्ये मिसळलेली भुकटी, घडवण्यासाठी आणलेल्या दागिन्यांमधून तसंच विजेची इस्त्री किंवा प्रवाशांच्या शरीरावर लपवून, यासारखे विविध मार्ग अवलंबण्यात आल्याचं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं काल संघटित मानवी तस्करी आणि सायबर गुन्हेगारीशी संबंधित पाच संशयित आरोपींना ताब्यात घेतलं. राज्य पोलीस दलांच्या सहयोगानं राबवलेल्या या मोहिमेत एनआयए नं देशातली एकूण सहा राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये १५ ठिकाणी  छापे टाकले. यावेळी डिजिटल उपकरणं, पासपोर्ट आणि बनावट रोजगार पत्र, यासारखं गुन्हेगारी स्वरूपाचं साहित्य जप्त करण्यात आलं.

वडोदरा, गोपालगंज, नैऋत्य दिल्ली, गुरुग्राम आणि चंदीगड इथून अटक करण्यात आलेले आरोपी, परदेशी नोकरीचं खोटं आमिष देऊन भारतीय युवकांची फसवणूक करणाऱ्या टोळीशी संबंधित होते. परदेशात गेल्यावर या युवकांना लाओस आणि कंबोडिया यासारख्या देशांमध्ये बनावट कॉल सेंटरमध्ये बेकायदेशीर काम करायला भाग पाडलं जात होतं, असं उघडकीला आलं आहे. या प्रकरणी विविध

राज्यांमध्ये ८ नवीन एफआयआर नोंदवण्यात आले असून, पुढला तपास सुरु आहे.

**<><><><><>**

युद्धविराम किंवा कैद्यांच्या सुटकेसंबंधी कोणत्याही चर्चेत आपण सहभागी होणार नसल्याचं हमासने आज स्पष्ट केलं. हमास आपल्या अटीवरच युद्धविरामासाठी करार करेल, असं हमासचे उच्चपदस्थ अधिकारी ओसामा हमदान यांनी बैरुत इथं बातमीदारांशी बोलताना सांगितलं. गेल्या रविवारी इस्रायलने रफाह शहरावर हवाई हल्ला केला होता. या पार्श्वभूमीवर हमासनं हा निर्णय घेतल्याचं सांगितलं जात आहे.

**<><><><><>**

आज मासिक पाळी स्वच्छता दिवस आहे. मासिक पाळी बाबतचे गैरसमज दूर करण्यासाठी आणि महिलांना मासिक पाळी दरम्यान स्वच्छतेच्या सुविधा सहज उपलब्ध करून देण्याबाबत जनजागृती करण्यासाठीची ही एक जागतिक चळवळ आहे. 'मासिक पाळीबाबत अनुकूल जग' ही यंदाची संकल्पना आहे.

**<><><><><>**

पापुआ न्यू गिनीमध्ये भूस्खलनामुळे झालेल्या जीवितहानीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. आपत्तीग्रस्तांना सर्व प्रकारचं सहकार्य आणि मदत करण्यासाठी भारत तयार असल्याचं त्यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या एका पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांनी काल पूर्व उपनगरातल्या घाटकोपर, विक्रोळी, मुलुंड भागातल्या मान्सूनपूर्व कामांची वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पाहणी केली. पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व आवश्यक कामे तातडीने पूर्ण करण्याचे

निर्देश आयुक्तांनी यावेळी  दिले.

**<><><><><>**

अखिल भारतीय फूटबॉल महासंघानं काल उजबेकिस्तानबरोबरच्या  दोन मैत्रीपूर्ण लढतींसाठी २३ खेळाडूंचा महिला फूटबॉल संघ जाहीर केला आहे.  या संघात तीन गोलकीपर्स, आठ डिफेंडर्स, आठ मीड फिल्डर्स आणि चार फॉरवर्ड्स चा समावेश आहे. माजी राष्ट्रीय खेळाडू लंगम चाओबा देवी हे या संघाचे प्रशिक्षक आहेत. ३१ मे आणि ४ जून रोजी ताश्कंद इथं हे सामने होणार आहेत.

**<><><><><>**

केरळमध्ये येत्या पाच दिवसांत मान्सूनसाठी अनुकूल परिस्थिती असल्याचं हवामान खात्यानं म्हटलं आहे. यंदाच्या मान्सूनमध्ये संपूर्ण देशात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

**//<><><><><>//**